**Regd. / Corporate / Share Dept. Office:**
901/902 Atlanta Centre,Sonawala Road, Opp Udhyog Bhavan,
Goregaon (E), Mumbai 400 063 Tel:91 22 4321 1800 Fax:91 22 4321 1875
Email:clio_infotech@yahoo.com Website :www.clioinfotech.in
CIN No:L65990MH1992PLC067450

CLIO INFOTECH LIMITED

**Date: 10.09.2024**

To:
The Bombay Stock Exchange
(BSE Limited)
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai- 400001

Dear Sir / Madam,

**Scrip Name: Clio Infotech Limited**

**SCRIPT CODE: 530839**
**COMPANY SYMBOL: CLIOINFO**

**Sub: Newspaper Publication – Information on E-Voting and other related information relating to ensuing 32ND Annual General Meeting of the Company.**

Pursuant to Regulation 30 read with Schedule III Part A Para A and Regulation 47 of SEBI Listing Regulations, we enclose the copies of newspaper advertisement published in The Financial Express (English) and Navakal – Marathi edition, in compliance with Ministry of Corporate Affairs General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, 17/2020 dated April 13, 2020, 20/2020 dated May 5, 2020, 10/2022 dated December 28, 2022 and subsequent circulars issued in this regard, the latest being, General Circular No. 09/2023 dated September 25, 2023 intimating that 32nd Annual General Meeting of the Company will be held on Monday, September 30, 2024 at 10:30 am (IST) through Video Conferencing (VC) /Other Audio Visual Means (OAVM).

Kindly take note of the above.

Thanking you,

Yours faithfully,

**FOR, CLIO INFOTECH LIMITED**

TIWADI NIKITA
Digitally signed by TIWADI NIKITA
Date: 2024.09.10 11:56:42 +05'30'

**MS NIKITA TIWADI**
**(MANGING DIRECTOR)**
**DIN: 10646772**
**Encl: As above**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# निवडणूक कुंभ आणि विकासकामे

**विकासाचे** धोरण हे प्रामुख्याने तीन स्तरांवर विचारात घेतले जाते. एक म्हणजे अर्थव्यवस्थेला गती देणे, दुसरा हेतू म्हणजे उद्योग विस्तारासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि सामान्य माणसाला रोजगाराबरोबरच इतर व्यावसायिक संधी उपलब्ध करून देणे, दुर्दैवाने अशा तीनही हेतूंबाबत समन्वयाचे धोरण नसल्याने बऱ्याच वेळेला विकासाचा प्रवास हा एकतर्फी होत राहतो. किंवा ज्याला वन वे ट्रॅफिक म्हणता येईल त्याप्रमाणे घडत राहतो. सामान्य माणसाच्या हिताला तिथे जवळपास नो एन्ट्री असल्यासारखे पाहायला मिळते. दूरदृष्टीपूर्ण पन्नास ते शंभर वर्षांचे उद्दिष्ट समोर ठेवून विकासाचे व्यापक नियोजन हे आपल्या देशामध्ये जवळपास अस्तित्वात नाही. आपल्या विकासाचे नियोजनही फार फार तर पंचवार्षिक योजनांपर्यंतच मर्यादित राहते. बाकी कोणत्याही विकासकामांबद्दल आज कोणीही शंभर वर्षांची हमी देऊ शकत नाही किंवा अशा विकासातून सामान्य माणसाला थेट अनेक वर्षे लाभ होत राहील असेदेखील सांगता येत नाही. ज्याप्रमाणे दर बारा वर्षांनी सिंहस्थ काळामध्ये कुंभमेळा भरतो. त्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक असेल, प्रयाग असेल, याठिकाणी लोकांच्या सोयीसाठी काही व्यवस्था उभ्या केल्या जातात. त्यानिमित्ताने रस्त्यांची किंवा इतर काही सोयीसुविधांची निर्मिती केली जाते. त्यातली काही विकासकामे ही पुढच्या कुंभमेळ्यापर्यंत टिकतात. बाकीची मात्र पुन्हा नव्याने उभारावी लागतात. तसाच काहीसा प्रकार देशभरातल्या अनेक विकासकामांबाबत होतो. निवडणुका आल्या की, या विकासकामांच्या घोषणांना तर उत येतोच. शिवाय निवडणुकांच्या निमित्ताने बऱ्याच विकासकामांचा श्रीगणेशाही होतो. सध्या महाराष्ट्राच्याबाबतीतही असेच घडते आहे. निवडणूक कुंभाच्यानिमित्ताने विकासकामांचा भडीमार सुरू आहे. त्यातली किती विकासकामे मुदतीमध्ये पूर्ण होतील हे सांगता येत नाही. परंतु कुंभमेळ्याच्यानिमित्ताने का होईना सामान्य माणसाला जो काही थोडाफार दिलासा मिळून जातो तोदेखील गरजेचा ठरतो. आता निवडणुकीच्या निमित्ताने का होईना काही विकासकामे मार्गी लागली तरी त्याचा लोकांना थोडाफार फायदा होऊ शकेल, असे समजायला हरकत नाही.

### रखडलेला प्रकल्प

अलिकडेच महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या मुंबई इंदोर रेल्वे मार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. जवळपास १८ हजार कोटी रुपयांची तरतूद असलेला ३०९ किलोमीटर लांबीचा हा रेल्वे मार्ग जवळपास पन्नास शहरांना थेट फायदा पोहोचवेल तर मुंबई, नाशिक, मनमाड, धुळे, इंदोर या मार्गावर पाचशेपेक्षा जास्त उद्योगांना सहाय्यभूत ठरणार आहे. प्रामुख्याने शेतमाल त्यातही कांद्यासारख्या उत्पादनाला या रेल्वे मार्गाने अधिक सुलभता मिळू शकते. एवढेच नव्हे तर मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील कापड उद्योग अधिक वेगाने विकसित होऊ शकतो. हा रेल्वे मार्ग सामान्य प्रवाशांसाठी दिलासा देणारा तर ठरेलच. कारण या नव्या मार्गामुळे मुंबई-इंदोर दरम्यानचे चार तासाचे अंतर कमी होणार आहे. शिवाय या रेल्वे मार्गाने एक नवी उद्योगपूरक व्यवस्था आकाराला येऊ शकते. गेल्या पन्नास वर्षांपासून मनमाड, इंदोर रेल्वे मार्गाची मागणी केली जात होती. दहा वर्षांपूर्वी तिच्या सर्वेक्षणाला मान्यता दिली गेली. आणि आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्यादृष्टीने अठरा हजार कोटींचा निधीदेखील मंजूर झालेला आहे. नाशिक आणि उज्जैन या दोन तीर्थक्षेत्रांना जोडण्याचेही काम होऊ शकेल. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात काही लाख प्रवाशांची सोय होणार आहे. अर्थातच हा रेल्वे मार्ग पूर्ण व्हायला पुढचा कुंभमेळा उजाडेल असे समजायला हरकत नाही. या विकासकामाचा उदाहरणादाखल विचार केला तर निवडणुकीच्या तोंडावर कशा पद्धतीने विकास कामे घोषित होतात याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न जरी असला तरी त्यानिमित्ताने सामान्य माणसाला मिळणारा थोडाफार दिलासा समाधानकारकच म्हणावा लागतो. याचा अर्थ निवडणुकांच्यानिमित्ताने होणाऱ्या या विकासकामांच्या घोषणांचा एकूण अभ्यासपूर्ण नियोजनाशी काही संबंध नसतो. जर तशी दूरदृष्टी असती तर हा प्रकल्प दहा पंधरा वर्षांपूर्वीच मार्गी लागला असता. उद्योग, व्यवसाय, रोजगार आणि पायाभूत सुविधा यांचा कोणताही समन्वयच नसल्याने विकासाचा हा एकतर्फी प्रवास होत राहतो. आणि असा वन वे ट्रॅफिक असला की, विलंब हा ठरलेला असतो. तसाच विलंब याही मार्गाला झाला.





Email-navakal.1923@gmail.com
मुंबई । मंगळवार १० सप्टेंबर, २०२४
www.navakal.in /navakalofficial

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणामुळेच पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी २९ पदकं जिंकून इतिहास घडवला

**दिव्यांगांच्या सक्षमीकरणामुळेच भारताच्या क्रीडा क्षेत्रात दिव्यांग खेळाडूंना त्यांच्यातील क्रीडाकौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. विविध क्रीडा प्रकारात दिव्यांग खेळाडू तयार झाले आणि त्यांनी पॅरा ऑलिम्पिकसारख्या मोठ्या स्पर्धेमध्ये भारताची मान उंचावली. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेल्या खेळाडूंना जे जमले नाही ते दिव्यांग खेळाडूंनी पॅरालिम्पिकमध्ये करून दाखवले. या खेळाडूंनी ७ सुवर्ण पदकांसह २९ पदकं जिंकून प्रथमच भारताला टॉप २० देशांच्या यादीत स्थान मिळवून दिले.**

पॅरिस

**मागील** टोकियो पॅरालिम्पिकमध्ये एकूण १९ पदकांसह भारत २४व्या स्थानी होता. पण पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये ८४ खेळाडूंनी २९ पदके आणली, तर ऑलिम्पिकमध्ये ११७ खेळाडू केवळ ६ पदके पटकावू शकले. यात एकही सुवर्ण नव्हते.

पॅरा ऑलिम्पिकच्या माजी अध्यक्षांनी सांगितले २०२० मध्ये खेळाडूंना मुख्य प्रवाहात आणण्याचा, खेळाडूंचे आकडे इंटरनेवर उपलब्ध करण्याचा आमचा उद्देश होता. आम्ही पॅरा-खेळाडूंना सोशल मीडियावर ब्लू टिकही मिळवून दिले, जेणेकरून लोकांनी त्यांना ओळखावे. पॅरा खेळांची ज्युनियर आणि सबज्युनियर चॅम्पियनशिप पुन्हा सुरू केली, जेणेकरून नवी कौशल्ये ओळखता येतील. नव्या प्रशिक्षकांना प्रशिक्षित केले. देशात जागतिक पातळीच्या पॅरा-स्पर्धा भरवल्या. खेळाडूंच्या मानसशास्त्रीय प्रशिक्षणावरही भर दिला. अनेक खेळाडू आपले माता-पिता किंवा भावांविना परदेशात जाऊ इच्छित नव्हते. तथापि, सरकारकडून फक्त एका सहकाऱ्याचाच निधी मिळतो. आम्ही फेडरेशनच्या खर्चावर या खेळाडूंसोबत जितकी गरज आहे तितकेच सहकारी पाठवले. सुदैवाने सरकार आणि मंत्रालयही पॅरा-खेळाडूंना समान सहकार्य करत आहे. देशात पॅरा-खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा वाढल्या आणि आता तर खेलो इंडिया पॅरा गेम्सही सुरू झाले आहेत. याचाच परिणाम पदकांमध्ये दिसत असल्याचे त्यांनी सांगितले.

---


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्रमांक ३४/२०२४-२०२५ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | लोटे-परशुराम औद्योगिक क्षेत्र.... लोटे-परशुराम औद्योगिक क्षेत्रातील ६३० मि.मि. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी निःसारण वाहिनीचा एनआयओने सुचविलेल्या विसर्ग बिंदू पर्यंत करंबवणे खाडीमध्ये विस्तार करणे. | ₹ ३८,०३,१०,७४९.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ११/०९/२०२४ ते दिनांक २५/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १७/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा दिनांक १९/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## पश्चिम रेल्वे
**शुध्दिपत्रक - ४**

**संकेतस्थळ https://www.ireps.gov.in/ मध्ये, पीपीपी मोडवर २१/०८/२०२४ रोजी मुंबई सेंट्रल, पश्चिम रेल्वेच्या जगजीवन राम रूग्णालय (जेआरएच) मध्ये रेडीयोलॉजीकल सेवा - सीटी / एमआरआय इत्यादीच्या स्थापनेसाठी निविदा क्र. : JRH-PPP-CTMRI--128-3 चे, आणि निविदा बंद होण्याची सुधारित तारीख १९/०९/२०२४ रोजी १५.०० वा. अन्य सर्व अटी व शर्ती अपरिवर्तीय आहेत.**

0531

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

## ठाणे महानगरपालिका, ठाणे
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सुचना**

ठाणे महानगरपालिका,अनुभवी निविदाकारांकडुन "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" अंतर्गत ठाणे १४८ विधानसभा क्षेत्रातील विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरीक कट्टा करणे,मैदान विकसित करणे,चौकाचे नुतनीकरण करणे,शौचालय नुतनीकरण ,शेड व स्थापत्य कामे करणे ०५(पाच)कामांकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथे दि.१०/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील . सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि. १८/०९/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १९/०९/२०२४रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/४६२/२४-२५ — सही/-
दि.०९.०९.२०२४ — कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site — ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

## बृहन्मुंबई महानगरपालिका
**सआएन/६३८/जन/इवका दि. ०४/०९/२०२४**
**सूचनापत्र**

एन विभागातील घाटकोपर (पू.), हिंदु स्मशान भूमी जवळ, ९० फीट रोड व सौमया महाविद्यालय जंक्शन येथे, रिक्त असलेली अति धोकादायक **मेघराज बार** (तळ मजला अधिक दोन माळे) इमारती बृहन्मुंबई महानगरपालिकामार्फत नोंदणीकृत अधिकृत कंत्राटदाराकडून स्थळदरपत्रिका (Spot Quotation) मागवून निष्कासन करण्याकरिता मान. उपायुक्त (परी.०६) यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर बाबतीत कोणालाही विरोध / आपत्ती असल्याने पुढील ०७ दिवसात कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी 'एन' विभाग, इमारत व कारखाने विभाग, ५ वा मजला, एन विभाग म.न.पा. कार्यालय, जवाहर मार्ग, घाटकोपर (पू.), मुंबई - ४०००७७ या कार्यालयास त्वरीत संपर्क करावे.

सही/- — सही/-
का. अ. (इ.व.का.) एन — सहाय्यक आयुक्त 'एन' विभाग
पीआरओ/१२१३/जाहि./२०२४-२५

**शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.**

## पनवेल महानगरपालिका
**जाहिर ई- निविदा सूचना**
**कालावधी - ३ वर्ष**

पनवेल महानगरपालिका मार्फत साजरे करण्यात येणारे उत्सव समारंभ करिता लागणारे मंडप, खुर्च्या, बॅरकॅटींग व इतर निविदा पत्रकात नमुद केलेले साहित्य भाडेतत्वावर पुरविणेकामी सन २०२४-२०२५, सन २०२५-२०२६ व सन २०२६-२०२७ या तीन वर्षाकरिता जाहिर ई निविदा प्रसिध्द करुन दर निश्चित करणेबाबत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र. : पमपा/भांडार/२७२४/प्र.क्र. ०१/६६४/२०२४
दिनांक : ०९/०९/२०२४

सही
(संतोष वारुळे)
उपायुक्त (भांडार)
पनवेल महानगरपालिका

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशीलांनी श्री. धिरेन महेंद्र शाहा आणि श्री. जयेश मनहरलाल अजमेरा यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णित मालमत्तेच्या शिर्षकाचे अन्वेषण करण्याची सूचना दिली आहे.

कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्तेच्या संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, तारण, पट्टा, धारणाधिकार, परवाना, बक्षिस, ताबा किंवा कोणताही बोजा किंवा अन्यथा कोणताही दावा, अधिकार किंवा स्वारस्य असल्यास, आजच्या तारखेपासून १४ दिवसात निम्नस्वारीताना, असल्यास अशा दाव्याच्या आधारभूत दस्तावेजांसह कळविण्याची विनंती करण्यात येत आहे, कसूर केल्यास, असा दावा आणि दाव्यांच्या संदर्भाशिवाय आमच्याकडून शिर्षक प्रमाणपत्र जारी करण्यात येईल, असल्यास, त्या व्यक्तीने सोडून दिला असे मानण्यात येईल आणि आमचे अशील बांधील राहणार नाहीत.

**उपरोक्त संदर्भाच्या मालमत्तेचे परिशिष्ट :**

मुंबईच्या नोंदणी जिल्हा उप - जिल्हा अंतर्गत वॉर्ड क्र. के-५ पूर्व धारक, गाव मोगरा, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित नटवर नगर रोड क्र. ५, सह्याद्री कॉटेज कंपाऊंड, पश्चिम द्रुतगती मार्गाजवळ, येथील मालमत्तेच्या नोंदणी कार्डानुसार मोजमापित १५४.३ चौरस मीटर्स, ७/१२ उताऱ्यानुसार मोजमापित ३०३ चौरस मीटर्स आणि भौतिक सर्वेक्षणानुसार २१०.३७ चौरस मीटर्स, स. क्र. २१, हिस्सा क्र. ४, सीटी सर्व्हे क्र. २३६ धारक जमिनीचे सर्व अंगीकृत भाग.

**मुंबई, दिनांकित १० सप्टेंबर, २०२४ रोजी.**

**मे. ए. व्ही. जैन असोसिएट्स,**
ॲडव्होकेट, हायकोर्ट
२६, दाराशॉ बिल्डींग, १ला मजला, २४, जांभुळवाडी,
धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२.
ashok@avjainassociates.com

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
**विद्युत विभाग**
**निविदा सुचना क्र. ०४ (२०२४ - २०२५)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत ०२ विद्युत कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सुचना व निविदा प्रपत्र महापालिकेच्या संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दिनांक १०/०९/२०२४ ते १६/०९/२०२४ पर्यंत सायं. ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. १०/०९/२०२४ ते १६/०९/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. १८/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१६२४
दि. ०९/०९/२०२४

सही/-
शहर अभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

## मध्य रेल्वे
**सामग्री व्यवस्थापन विभाग**
**ई-प्रापण एडीव्हीटी. निविदा सूचना क्र. ई-३६ - २०२४, दि.०५.०९.२०२४**

| निविदा क्र. | बाब तपशिल | परिमाण | नि.उ.ता. |
|---|---|---|---|
| ४१२४१००२ | अर्थिंग केबल | १०२०१ नग | २०-०९-२०२४ |
| २७२४४७६६ | हाय टेन्साईल सी. बी. कप्लर | १८४ नग | २३-०९-२०२४ |
| ३८२४४९७० | एअर स्प्रींग असेम्बली (१४० केएन क्षमता) | ४० नग | ०१-१०-२०२४ |
| ७१२४५०८० | ५०/१५ ट. क्षमतेची इलेक्ट्रीक ओव्हरहेड ट्रॅव्हलींग (ईओटी) क्रेन. | ०१ नग | ०३-१०-२०२४ |
| ३८२४३३५८ | फीयाट आयआर बोंगीसाठी प्रायमरी सस्पेंशन करिता रबर पॅड | ६०८० नग | ०४-१०-२०२४ |
| ३८२४३३६५ | सर्व कॉईल फीयाट बोगींसाठी सेकंडरी लॅटरल डम्पर | १२११ नग | ०७-१०-२०२४ |
| ७१२४५०८१ | १५ ट. क्षमतेची इलेक्ट्रीक ओव्हरहेड ट्रॅव्हलींग (ईओटी) क्रेन. | ०१ नग | ०७-१०-२०२४ |

सविस्तर सूचना आणि निविदा अटीं संकेतस्थळ www.ireps.gov.in वरून पाहू आणि डाऊनलोड करू शकता.

प्रमुख मुख्य सामग्री व्यवस्थापक/छशिमट

तिकीटासाठी UTS App डाऊनलोड करा AK-396

## क्लिओ इन्फोटेक लिमिटेड
CIN क्रमांक: L65990MH1992PLC067450
**नोंदणीकृत कार्यालय :** कार्यालय क्रमांक 901/902, 9 वा मजला, अटलांटा सेंटर, उद्योग भवनच्या समोर, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, 400063
**फोन:** +91 8099569519, **ईमेल:** infotechclio@gmail.com, **वेबसाइट:** www.clioinfotech.in

**32 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भातील सूचना**

1. कंपनीची 32 वी (बत्तीसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा ("AGM") सोमवार, 30 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 10:30 वाजता (IST) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("VC") / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमे ("OAVM") यांच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. कंपनी कायदा, 2013 आणि त्यातील नियम आणि SEBI (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, 2015 च्या सर्व तरतुदींनुसार, तसेच जनरल सर्क्युलर क्रमांक 14/2020 आणि 17/2020, दिनांक 8 एप्रिल 2020 आणि 13 एप्रिल 2020 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचना, "Covid-19 च्या संकटामुळे कंपन्यांनी साधारण आणि विशेष ठराव पारित करण्याबाबत स्पष्टीकरण", जनरल सर्क्युलर क्रमांक 20/2020 दिनांक 5 मे 2020, जनरल सर्क्युलर क्रमांक 02/2021 आणि 21/2021 दिनांक 13 जानेवारी 2021 आणि 14 डिसेंबर 2021, MCA सर्क्युलर क्रमांक 9/2023 दिनांक 25.09.2023, SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 दिनांक 13 मे 2022 आणि SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/167 दिनांक 07 ऑक्टोबर 2023 यांनी जारी केलेले (येथून पुढे "सर्क्युलर्स" म्हणून संदर्भित) यानुसार घेतली जाईल. एजीएमसाठी देण्यात आलेल्या नोटिसमधील व्यवसायांवर चर्चा केली जाईल. सदस्य VC किंवा OAVM च्या माध्यमातून सभेत सहभागी होऊ शकतील. VC किंवा OAVM द्वारे सहभागी होणारे सदस्य कंपनी कायदा, 2013 च्या कलम 103 अंतर्गत कोरमच्या उद्देशाने विचारात घेतले जातील.
2. संबंधित सर्क्युलर्सचे पालन करून, एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष 2023-24 साठीचा वार्षिक अहवाल कंपनीच्या सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येईल, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स कडे नोंदणीकृत आहेत. वरील कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध असतील: https://clioinfotech.in/ आणि कंपनीचे समभाग सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच http://www.bseindia.com. सदस्य एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात, एजीएममध्ये सहभागी होण्यासाठी सूचना एजीएमच्या नोटिसमध्ये दिल्या आहेत. याशिवाय, ज्यांनी त्यांचा ईमेल पत्ते RTA / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स कडे नोंदणीकृत केले नाहीत, असे सदस्य सभेत सहभागी होऊ शकणार नाहीत.
3. ई-मेल पत्त्यांची नोंदणी / अद्यतने करण्याची पद्धत:
   अ) जर शेअर्स भौतिक स्वरूपात ठेवलेले असतील तर कृपया फोलिओ नंबर, शेअर्सधारकाचे नाव, शेअर सर्टिफिकेटची स्कॅन केलेली प्रति (समोरील व मागील बाजू), पॅन (स्वयंपरीक्षित स्कॅन केलेली पॅन कार्डची प्रति), आधार (स्वयंपरीक्षित स्कॅन केलेली आधार कार्डची प्रति) ई-मेल द्वारे infotechclio@gmail.com वर पाठवा.
   ब) जर शेअर्स डिमॅट मोडमध्ये ठेवलेले असतील तर कृपया DPID-CLID (16 अंकी DPID + CLID किंवा १६ अंकी बेनेफिशियरी ID), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित खाते विवरणाची प्रति, पॅन (स्वयंपरीक्षित स्कॅन केलेली पॅन कार्डची प्रति), आधार (स्वयंपरीक्षित स्कॅन केलेली आधार कार्डची प्रति) infotechclio@gmail.com वर पाठवा.
4. ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत:
   कंपनीने AGM च्या नोटिसमध्ये दिलेल्या सर्व ठरावांवर मत द्यायची सुविधा सर्व सदस्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अतिरिक्त, AGM दरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा देखील कंपनीने उपलब्ध करून दिली आहे. दूरस्थ ई-मतदान / ई-मतदान प्रक्रियेची तपशीलवार माहिती AGM च्या नोटिसमध्ये दिली आहे.
5. सभासदांनी AGM च्या नोटिसमध्ये दिलेल्या सर्व नोट्स काळजीपूर्वक वाचाव्यात आणि विशेषतः AGM मध्ये सहभागी होण्याच्या सूचनांचे, दूरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा AGM दरम्यान ई-मतदानाद्वारे मतदान करण्याच्या पद्धतीचे पालन करावे.
6. आपल्याला कळविण्यात येत आहे की कंपनीने 30 सप्टेंबर 2024 रोजी होणाऱ्या AGM साठी मतदानाच्या उद्देशाने 20 सप्टेंबर 2024 या दिनांकाला कट-ऑफ तारीख म्हणून निश्चित केले आहे.
7. पुढे, कंपनीच्या सदस्यांची नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तके 24 सप्टेंबर 2024 ते 30 सप्टेंबर 2024 (दोन्ही दिवस समाविष्ट) या कालावधीसाठी AGM च्या उद्देशाने बंद राहतील.
8. दूरस्थ ई-मतदानाची अवधि शुक्रवार, 27 सप्टेंबर 2024 (सकाळी 9:00 वाजता) पासून सुरू होईल आणि रविवार, 29 सप्टेंबर 2024 (संध्याकाळी 5:00 वाजता) समाप्त होईल.

बोर्डाच्या आदेशाने,
क्लिओ इन्फोटेक लिमिटेड साठी
स्वाक्षरी /-
स्थान: मुंबई — जीग्नेशकुमार कल्याणभाई देवगणिया
दिनांक: 07.09.2024 — कंपनी सचिव

## फॉर्म जी
**सी आणि एम फार्मिंग लिमिटेड साठी स्वारस्य व्यक्त करण्यासाठी आमंत्रण**
**नाशिक येथे कफलोत्पादन/कुक्कुटपालन व्यवसाय करत आहे**
(भारतीय दिवाळखोरी आणि दिवाळखोरी बोर्ड (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) नियमावली, २०१६ च्या नियमन ३६अ च्या उपनियम (१) अंतर्गत )

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन / सीआयएन एल - एलपी क्र. सह | **सी आणि एम फार्मिंग लिमिटेड** CIN - U01110MH1980PLC022710 PAN- AAACC0473C |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | सी अँड एम हाउस, एन डी पटेल रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत – ४२२००१ |
| ३. | संकेतस्थळाचा युआरएल | वेबसाईट नाही |
| ४. | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत नाशिक, महाराष्ट्र त्या ठिकाणाचे तपशील | नाशिक, महाराष्ट्र. |
| ५. | मुख्य उत्पादने / सेवांची स्थापित क्षमता | निरंक |
| ६. | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य निरंक उत्पादनांचे / सेवांचे प्रमाण आणि मूल्य | निरंक |
| ७. | कर्मचारी / कामगारांची संख्या | 0 |
| ८. | दोन वर्षांच्या अंतिम उपलब्ध आर्थिक विवरणांसह (शेड्युलसह) पुढील तपशील, कर्जदारांच्या याद्या युआरएल वर उपलब्ध आहेत: | cirp.candmfarmingltd@gmail.com वर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल / रिझोल्यूशन प्रोफेशनल ला ईमेल लिहून तपशील / माहिती मागवली जाऊ शकते. |
| ९. | संहितेच्या कलम २५ (२) (ह) अंतर्गत ठराव अर्जदारांसाठी पात्रता येथे उपलब्ध आहे | रिझोल्यूशन प्लॅन (आमंत्रण) सबमिट करण्यासाठी स्वारस्य व्यक्त करण्यासाठी तपशीलवार आमंत्रणात पात्रता निकष नमूद केले आहेत. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त करण्याची तारीख | २५ सप्टेंबर २०२४ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | ३० सप्टेंबर २०२४ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ५ ऑक्टोबर २०२४ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | ८ ऑक्टोबर 2024 |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | ११ ऑक्टोबर २०२४ |
| १५. | संकल्प योजना सादर करण्याची शेवटची तारीख | १० नोव्हेंबर २०२४ |
| १६. | एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट सबमिट करण्यासाठी ईमेल आयडीवर प्रक्रिया | cirp.candmfarmingltd@gmail.com |

नोंद* : उपरोक्त टाइमलाइन ९ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या ५ व्या सीओसी बैठकीत सीओसी सदस्यांनी मंजूर केल्यानुसार सीआयआरपी कालावधी ९० दिवसांच्या कालावधीसाठी वाढवण्याच्या माननीय एनसीएलटी , मुंबई खंडपीठाच्या आदेशाच्या अधीन आहेत.

स्वाक्षरी /-
अभिजित गोखले, अधिकृत आयपी / संचालक,
ओरियन रिझोल्यूशन आणि टर्नअराउंड प्रायव्हेट लिमिटेड
रेझोल्यूशन प्रोफेशनल ऑफ सी आणि एम फार्मिंग लिमिटेड
IPE- IBBI/IPE-0089/IPA-3/2023-24/50066 चा नोंदणी क्रमांक
IP म्हणून नोंदणी क्रमांक – ICAI/IPE/0016
**नोंदणीकृत पत्ता:** 811,8वा मजला, मेडोज, सहार प्लाझा कॉम्प्लेक्स, जवळ जे बी नगर/चकाला मेट्रो स्टेशन, अंधेरी - कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००६९.
IPE चा नोंदणीकृत ईमेल आयडी: ipe@orionipe.com
**पत्रव्यवहारासाठी विशिष्ट ई-मेल आयडीवर प्रक्रिया करा:** cirp.candmfarmingltd@gmail.com
एएफए 21 नोव्हेंबर 2024 पर्यंत वैध
10 सप्टेंबर 2024 - मुंबई

## फॉर्म बी
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२ )

**जॅन्स कॉपर प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **जॅन्स कॉपर प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २३ मार्च, २०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना / नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | CIN: U27310MH2011PTC215149 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ११/४३ , लाइफस्केप निलय, दुकान क्र. 8, ठाकुरवार रोड, बँक ऑफ, बडोदा समोर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००००२ |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | ५ सप्टेंबर २०२४ |
| ७. | कॉर्पोरेट कर्जदाराचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | "आदरणीय NCLT ने दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी लिक्विडेशन आदेश दिला; आणि खाली स्वाक्षरीत व्यक्तीला IBBI पॅनलमधून IP म्हणून नेमले. २७ ऑगस्ट २०२४ रोजी याची माहिती मिळाली. आत्तापर्यंत NCLT कडून कोणतेही पत्रव्यवहार झालेले नाहीत. (आरपीकडून ई-मेलवर ५ सप्टेंबर २०२४ रोजी चार्ज प्राप्त झाला आहे.)" |
| ८. | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | संजय रामदास महाजन IBBI Registration No. IBBI/IPA- 001/IP-P-02122/2021-2022/13523 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | नोंदणीकृत पत्ता : ३/३, मोहनलाल मॅन्शन, भांडारकर रोड, माटुंगा सेंट्रल, मुंबई - ४०००१९ ईमेल : sanjayrmahajan@hotmail.com |
| १०. | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | **कार्यालयाचा पत्ता :** ओरियन रिझोल्यूशन आणि टर्नअराउंड प्रायव्हेट लिमिटेड, ८११ , ८ वा मजला, मेडोज, सहार प्लाझा कॉम्प्लेक्स, जवळ जे बी नगर/ चकाला मेट्रो स्टेशन, अंधेरी - कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. ईमेल : liquidation.janscopper@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ४ ऑक्टोबर २०२४ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. **१३ ऑगस्ट २०२४** रोजी **जॅन्स कॉपर प्रायव्हेट लिमिटेडचे** परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले. लिक्विडेटरला रिझोल्यूशन प्रोफेशनलकडून **५ सप्टेंबर २०२४** रोजी ई-मेलवर शुल्क प्राप्त झाले.

**जॅन्स कॉपर प्रायव्हेट लिमिटेडच्या** भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. **ऑक्टोबर ४ ,२०२४** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रोनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

जर भागधारकाने त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाद्वारे सादर केलेले दावे, भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन २०१६ अन्वये नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ३८ अन्वये सादर करण्यात आल्याचे मानले जाईल.

**तारीख : १० सप्टेंबर २०२४**
**ठिकाण: मुंबई**

आयपी संजय रामदास महाजन
लिक्विडेटर
जॅन्स कॉपर प्रायव्हेट लिमिटेड
**नोंदणी क्रमांक:** IBBI/IPA-001/IP-P02122/2021-22/13523
**पत्ता:** ३/३, मोहनलाल मॅन्शन, भांडारकर रोड, माटुंगा सेंट्रल, मुंबई – ४०००१९
एएफए 30 जून 2025 पर्यंत वैध


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आयुष्याच्या खेळात हार जीत असे काही नसते, आपणच कोणाशी तरी तुलना करत यशापयशाचे गणित मांडत असतो.**

## पंचांग

मंगळवार, १० सप्टेंबर, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर

भाद्रपद शुक्ल सप्तमी
नक्षत्र : अनुराधा



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृश्चिक

रवी उदय- ०६-२७
रवी अस्त- १८-४४

ज्येष्ठा गौरी आवाहन रात्री ८.०२ पर्यंत, अभुक्ता भरण व्रत, आत्महत्या प्रतिबंधक दिन

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८९०८११६४२३, ८९०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** •Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)